RNI No. MAHBIL /2009/31733

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक ७८]　　बुधवार, जुलै १७, २०१९/आषाढ २६, शके १९४१　　[पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १७०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**विधि व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ जुलै २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम.**

क्रमांक सीआरसी. ०४१३/४६६/प्र.क्र. ८७/कार्यासन ११.—महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९ (१८६९ चा १४) याच्या कलम १४ व १९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या अधिसूचना, जेथवर अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, कर्जत व जामखेड या महसूल तालुक्यांशी संबंधित असतील तेथवर, त्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे असा निदेश देत आहेत की, दिनांक १४ जुलै २०१९ पासून ;

(क) श्रीगोंदा येथे अतिरिक्त जिल्हा न्यायालय असेल आणि जिल्हा न्यायाधीश-१ श्रीगोंदा हे उक्त न्यायालयाचे पीठासीन अधिकारी असतील ;

(ख) उक्त न्यायालयाच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमा ह्या अहमदनगर जिल्ह्यातील दिवाणी न्यायालय, वरिष्ठ आणि कनिष्ठ स्तर, श्रीगोंदा, तसेच दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर कर्जत आणि जामखेड मधील महसुली तालुक्यांच्या क्षेत्राशी समव्यापी असतील आणि त्या स्थानिक सीमामध्ये, त्या महसुली तालुक्यांना मिळून बनलेल्या क्षेत्रांचा समावेश असेल ; आणि

(ग) उक्त अधिनियमाच्या कलम ९ अन्वये प्रधान जिल्हा न्यायाधीश यांच्याकडे निहित केलेले असतील असे अधिकार वगळता आणि त्यांना योग्य वाटतील अशी प्रकरणे जिल्हा न्यायाधीश यांच्याकडे सोपवण्याचा अथवा ती स्वतःकडे घेण्याचा अथवा एखाद्या सक्षम अधिकारिता असणाऱ्या दुसऱ्या न्यायालयाकडे सोपवण्याचा त्यांचा अधिकार वगळता, इतर सर्व अधिकार हे, उक्त जिल्हा न्यायाधीश-१, श्रीगोंदा कडे निहित होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**यो. ही. आमेटा,**
शासनाचे सह सचिव.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 9th July 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CIVIL COURTS ACT.

No. CRC. 0413/466/C.R. 87/Desk 11.—In exercise of the powers conferred by sections 14 and 19 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869) and of all other powers enabling it in this behalf, and in modification of all earlier notification issued in this behalf, in so far as they relates to the revenue talukas of Shrigonda , Karjat and Jamkhed in Ahmednagar District, the Government of Maharashtra hereby directs that with effect from the 14th July 2019.

(*a*) there shall be a Court of Additional District Judge at Shrigonda and the said Court shall be presided over by the District Judge-1, Shrigonda ;

(*b*) the local limits of the ordinary jurisdiction shall be co-extensive with the existing jurisdiction of the Court of Civil Judge, Senior Division and Junior Division, Shrigonda and the Court of Civil Judge Junior Division, Karjat and Jamkhed, comprising the revenue talukas of Shrigonda, Karjat and Jamkhed in Ahmednagar District ;

(*c*) all the powers of the Principal District Judge, Ahmednagar shall vest in the said District Judge-1, Shrigonda except those vested in the Principal District Judge under Section 9 of the said Act and his power to assign to District Judges at Ahmednagar or withdraw unto himself or to assign to another Court of competent jurisdiction, such matters as he thinks fit.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Y. H. AMETA,
Joint Secretary to Government.